*सूचना : (१) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.*

*(२) प्रश्नांची उत्तरे लिहिताना आवश्यक तेथे योग्य आकृत्या / आलेख काढावे.*

*(३) रंगीत पेन्सिलचा वापर करण्यास परवानगी आहे.*

*(४) नकाशा स्टेन्सिलचा वापर करण्यास परवानगी आहे.*

*(५) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.*

*(६) नकाशा पुरवणी मूळ उत्तरपत्रिकेस जोडावी.*

प्र. १. दिलेल्या सूचनेनुसार खालील उपप्रश्न सोडवा. [२०]

(अ) 'अ' 'ब' आणि 'क' स्तंभातील घटकांचे सहसंबंध लावून ओळखून पूर्ण करा : (५)

| क्र. | 'अ' | 'ब' | 'क' |
|---|---|---|---|
| (१) | नकाशा तयार करणे | (क) दिल्ली | (य) नायजर |
| (२) | प्रशासकीय शहरे | (ख) पंपाज | (र) लघुउद्योग |
| (३) | गवताळ प्रदेश | (ग) निरीक्षण | (ल) भूगोल अभ्यासकाची कौशल्ये |
| (४) | खेळणी | (घ) बांग्लादेश | (व) न्यूयॉर्क |
| (५) | लोकसंख्या विस्फोट | (ड) कागद निर्मिती उद्योग | (श) अर्जेंटिना |

(ब) अचूक पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा : (५)

(१) तृतीयक व्यवसायामध्ये समावेश होतो –

(अ) मासेमारी

(ब) साखर उद्योग

(क) पशुपालन

(ड) व्यापार

(२) लोकसंख्या वितरणावर परिणाम करणारा मानवी घटक –

(अ) हवामान

(ब) मृदा

(क) वाहतूक

(ड) भूरचना

(३) विस्तृत व्यापारी शेतीतील प्रमुख पीक –

(अ) कॉफी

(ब) गहू

(क) तांदूळ

(ड) औषधी वनस्पती

(४) कार्यात्मक प्रदेश –

(अ) पुणे महानगर

(ब) लातूर

(क) सातारा

(ड) अमरावती

(५) भारत हेवी इलेक्ट्रिकल लिमिटेड (BHEL) हा खालीलपैकी उद्योग प्रकार आहे –

(अ) संयुक्त क्षेत्र

(ब) सहकारी क्षेत्र

(क) सार्वजनिक क्षेत्र

(ड) खाजगी क्षेत्र

(क) पुढील विधाने दिलेल्या सूचनेनुसार पूर्ण करा : (५)

(१) भांडवल गुंतवणुकीनुसार निम्न उद्योगांचा उतरता क्रम लावा –

(अ) लघुउद्योग

(ब) सूक्ष्म उद्योग

(क) मोठे उद्योग

(ड) मध्यम उद्योग

(२) चुकीचा घटक ओळखा –

(अ) संशोधन

(ब) प्रशिक्षण

(क) शिकार

(ड) अध्यापन

(३) खालील देशांचा स्थानानुसार पश्चिमेकडून पूर्वेकडे योग्य क्रम लावा –

(अ) फ्रान्स

(ब) भारत

(क) जपान

(ड) संयुक्त संस्थाने (U.S.A.)

(४) लोकसंख्या संक्रमण सिद्धांतातील 'नंतरच्या काळात विस्तारणारा' या टप्प्यातून जाणारा देश ओळखा -

(अ) जर्मनी

(ब) स्वीडन

(क) कांगो

(ड) चीन

(५) मासेमारी क्षेत्रासाठीची सर्वोत्तम स्थिती -

(अ) दंतूर किनारे - उथळ समुद्र - उष्ण हवामान - प्लवंकांची वाढ

(ब) उथळ समुद्र - उष्ण-थंड सागरी प्रवाहांचा संगम -प्लवंकांची वाढ - थंड हवामान

(क) भूखंड मंच - प्लवंकांची वाढ - मासेमारीची उत्तम कौशल्ये - उष्ण हवामान

(ड) भूखंड मंच - दंतूर किनारे - प्लवंकांची वाढ - उष्ण हवामान

**(ड) 'बरोबर' की 'चूक' लिहा :** (५)

(१) आर्थिक भूगोल ही मानवी भूगोलाची शाखा आहे.

(२) स्थलांतर हा लोकसंख्या बदलातील घटक नाही.

(३) ग्रामीण व नागरी क्षेत्रांमधील भूमीस ग्रामीण नागरी झालर क्षेत्र म्हणतात.

(४) शेतीच्या विकासावर अनेक प्राकृतिक व मानवी घटकांचा प्रभाव पडतो.

(५) उद्योगाच्या स्थानावर परिणाम करणारे घटक सर्वत्र समान असतात.

प्र. २. **खालील विधानांची भौगोलिक कारणे लिहा ( कोणतेही चार ) (कोणतेही तीन मुद्दे ) :** [१२]

(१) कोकणातील रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात अनेक फळप्रक्रिया उद्योग स्थापित झालेले आढळतात.

(२) हिमालय पर्वतीय प्रदेशात कमी लोकसंख्या आढळते.

(३) प्रादेशिक विकास हा प्राकृतिक रचनेवर अवलंबून असतो.

(४) लोकसंख्येतील साक्षरतेचे प्रमाण हे देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासाचे द्योतक असते.

(५) सर्वच ग्रामीण वस्त्यांचे रूपांतर नागरी वस्तीत होतेच असे नाही.

(६) भौगोलिक विविधता ही व्यापारास कारणीभूत असते.

प्र. ३. **खालील फरक स्पष्ट करा ( कोणतेही तीन ) :** [९]

(१) देणारा प्रदेश आणि घेणारा प्रदेश

(२) स्थलांतरित शेती आणि मळ्याची शेती

(३) जल वाहतूक आणि हवाई वाहतूक

(४) प्राकृतिक भूगोल आणि मानवी भूगोल

(५) औपचारिक प्रदेश आणि कार्यात्मक प्रदेश

प्र. ४. **( अ )** दिलेल्या जगाच्या नकाशा आराखड्यात पुढील माहिती भरा (कोणतेही सहा) (सूची आवश्यक) : [११] (६)

(१) भारतातील जास्त लोकसंख्येचे शहर – मुंबई

(२) जगातील सर्वाधिक लिंगगुणोत्तर असणारा देश – रशिया

(३) ग्रँड बँक मत्स्यक्षेत्र

(४) कॅनडातील लाकूडतोड क्षेत्र

(५) जपानमधील कोणताही एक औद्योगिक प्रदेश

(६) दक्षिण अमेरिकेतील तेल उत्पादक देश – व्हेनेझुएला


(७) दक्षिण आफ्रिकेतील प्रमुख बंदर – केपटाऊन

(८) ट्रान्स ऑस्ट्रेलियन लोहमार्ग

**( ब )** दिलेल्या विभाजित वर्तुळाचे निरीक्षण करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा : (५)

**विभाजित वर्तुळ**

**लोकसंख्या वितरणाची टक्केवारी - २०१९ ( टक्क्यांमध्ये )**




प्रश्न :

( १ ) कोणत्या खंडात सर्वाधिक लोकसंख्या आहे?

( २ ) जागतिक लोकसंख्येपैकी ९.६९ टक्के लोकसंख्या कोणत्या खंडात आहे?

( ३ ) सर्वांत कमी लोकसंख्या कोणत्या खंडात आहे?

( ४ ) युरोप खंडात किती टक्के लोकसंख्या आहे?

( ५ ) वरील विभाजित वर्तुळात कोणता खंड नाही? आणि का?

**प्र. ५. खालीलपैकी संक्षिप्त टिपा लिहा ( कोणत्याही <u>तीन</u> ) :** **[१२]**

( १ ) स्थलांतराची कारणे

( २ ) भारतातील प्रादेशिक विषमतेवर परिणाम करणारे घटक

(३) जन्मदर आणि मृत्युदरातील सहसंबंध

(४) संदेशवहनाची साधने

(५) भूगोलाचे स्वरूप

प्र. ६. (अ) खाली दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून प्रश्नांची उत्तरे लिहा : (४) [८]

सुमारे ३५०० वर्षांपूर्वी क्रीट बेटावरील नॉसॉस हे शहर मिनॉन संस्कृतीचे मुख्य केंद्र होते. इ.स. पूर्व ५०० पर्यंत ग्रीस हे पृथ्वीवरील सर्वाधिक शहरीकरण झालेल्या क्षेत्रांपैकी एक बनले होते. ग्रीकांनी मुख्य भूमी व बेटांवर ५०० हून अधिक शहरे व गावे वसवली होती. अथेन्स व स्पार्टा ही ग्रीसची प्रमुख शहरे होती. अथेन्स हे जगातील सर्वांत मोठे शहर असावे.

त्या काळात अथेन्स शहरात अंदाजे २,५०,००० रहिवासी वास्तव्य करत होते. ग्रीक शहरे धर्म आणि शक्तीची केंद्रे असूनही आर्थिक केंद्र म्हणूनही त्यांनी काम केले आहे. शहरे ही मुख्य बाजारपेठ तळं होती, जिथून श्रीमंत व्यापारी, जमीन आणि पशुधन मालक आणि व्यापारी कार्यरत होते. शैक्षणिक केंद्रे म्हणून शहरातील रहिवाशांमध्ये शिक्षक व तत्त्वज्ञांचाही समावेश होता. त्या काळात हस्तकला उद्योगांचाही विकास झाला होता व सर्वोत्कृष्ट हस्तकला लोकांना आकर्षित करीत होती. शहरांच्या या सर्व भूमिकांमध्ये प्राचीन शहरे सांस्कृतिक, सामाजिक, शक्ती व अधिकार यांच्यातील परिवर्तनाची केंद्रबिंदू होती.

प्रश्न :

(१) ग्रीक कालखंडात जगातील सर्वात मोठे शहर कोणते होते?

(२) ग्रीक शहरांची भूमिका सांगा.

(३) अथेन्स शहराची अंदाजे लोकसंख्या किती होती?

(४) प्राचीन ग्रीक शहरात कोणकोणत्या सेवा सुविधा होत्या?

**(ब)** आकृती काढून नावे द्या (कोणतेही दोन) : (४)

(१) रेषीय वस्ती

(२) प्रादेशिक असंतुलन कमी करण्यासाठी सार्वजनिक वस्तूंची / सेवांची तरतूद.

(३) मानवी भूगोलाच्या शाखा.

**प्र. ७. खालील प्रश्नांचे सविस्तर उत्तरे लिहा ( कोणताही एक ) :** [८]

(१) विस्तृत व्यापारी धान्य शेतीची वैशिष्ट्ये वितरणासह स्पष्ट करा.

(२) उद्योगधंद्याच्या स्थानिकीकरणावर परिणाम करणारे घटक स्पष्ट करा.

◆◆◆